# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१३ – १४

## हुतात्मा शिवराम हरी राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

लोकमत पुणे, रविवार, दि. २५ ऑगस्ट २०१३ ९

# युवकांमध्ये देशभक्तीची भावना कमी होतेय




हुतात्मा शिवराम हरी राजगुरु आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी बोलताना संस्थेचे ॲड. दवेंद्र बुट्टे-पाटील.

राजगुरुनगर : युवकांमध्ये देशभक्तीची भावना कमी होणे, ही खेदाची बाब आहे, असे मत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी येथे व्यक्त केले.

हुतात्मा राजगुरुंच्या जयंतीनिमित्त हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातर्फे आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा दरवर्षी आयोजित केली जाते. स्पर्धेचे हे २४ वे वर्ष आहे. आज या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून ॲड. बुट्टे-पाटील बोलत होते. संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, परीक्षक प्रा. डॉ. राजाभाऊ भैलुमे, प्रा. डॉ. बाबासाहेब शेंडगे, संस्थेचे संचालक साई शिंदे आदी उपस्थित होते.

बुट्टे-पाटील पुढे म्हणाले, देशासाठी हुतात्मा राजगुरुंनी आत्मबलिदान केले. त्यांचे जिवंत स्मारक राहावे म्हणून संस्थापक साहेबराव बुट्टे-पाटलांनी आपल्या कुटुंबीयांचे नाव न देता त्या थोर हुतात्म्याचे नाव या महाविद्यालयास दिले. त्यांची पिढीच देशप्रेमाने भारलेली होती. अशी देशभक्तीची भावना आता कमी होत आहे. अलीकडे बऱ्याचदा देशभक्तीचा देखावा केला जातो. त्याचा उपयोग नसून प्रत्यक्ष कृतीची आवश्यकता आहे. तरुणांच्या आचार-विचार व प्रचारात एकवाक्यता असणे गरजेचे आहे. प्रास्ताविक वक्तृत्व स्पर्धा समितीचे प्रमुख प्रा. डॉ. टी. जी. गिते यांनी केले. प्राचार्य पाटील यांचेही भाषण झाले. तसेच प्राजक्ता साबळे आणि मीनाक्षी मोरे यांची भाषणे झाली. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. बी. डी. अनुसे यांनी केला. प्रा. डॉ. एस. डी. शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. छाया खेडकर यांनी आभार मानले. (वार्ताहर)

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख